सायं. दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo-9422404740

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ | अंक - ८२ | सोमवार, दि.०१ एप्रिल २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 | Issue - 82 | Monday, Dt.01 April 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4




बीड ।प्रतिनिधी
बीड जिल्ह्याचे प्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर शेख माजीद उर्फ मज्जू भैया यांच्या चिरंजीव शीस यांना विशाखपट्टणम आई आई एम येथे आयोजित केलेल्या मोठा कार्यक्रमात मान्यवरांचे हस्ते एम बी ए पदव्युत्तर प्रदान करण्यात आला आहे. शीस माजीद शेख हे एक गुणवंत आणि अभ्यासू वृत्तीचे युवक असल्याने युवा पिढीसाठी तो एक प्रेरणा ठरत आहे. या पूर्वी माजीद शेख यांची कन्या ही एम बी बी एस करून एलित हॉस्पिटल मध्ये वैद्यकीय फील्ड मध्ये कार्यरत आहे. शीस माजीद शेख यांनी यशस्वी रीतीने देशाची सर्व श्रेष्ठ आई आई एम संस्था मध्ये शिक्षा घेऊन एम बी ए स्नातक पूर्ण केल्याने बीड मध्ये उत्साह आणि आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

# गंडले कुटुंबाचा वारसा चालविताना सोनिया बनली न्यायाधीश !

## वडील सुप्रसिद्ध वकील, आई सरकारी वकील तर भाऊ कायद्याचा विद्यार्थी





### अखख गंडले कुटुंबच कायद्याचे सेवक !

एडवोकेट अविनाश गंडले हे बीड येथील सुप्रसिद्ध सुप्रसिद्ध असे ज्येष्ठ वकील आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामध्ये अनेक जण सध्या प्रॅक्टिस करताना दिसतात. दुसरीकडे त्यांच्या सुविद्य पत्नी मनीषा या औरंगाबाद येथे सरकारी वकील आहेत. त्यांची कन्या सोनिया हिने कायद्याचे शिक्षण पूर्ण केले आणि आता तीची न्यायाधीश पदी निवड झाली आहे. अविनाश गंडले यांचा अनिकेत नावाचा मुलगा हा सुद्धा कायद्याचे शिक्षण घेत असून, लवकरच तो कायद्याची पदवी पूर्ण करीत आहे.तसेच अविनाश गंडले यांचे बंधू महेंद्र गंडले हे पण औरंगाबाद येथे सुप्रसिद्ध वकील आहेत. एकूणच संपूर्ण गंडले कुटुंब हे कायद्याचे सेवक असल्याचे दिसते.



विश्वनायक न्यूज
एखाद्या कुटुंबाचा वारसा चालविणे म्हणजे काय असते याची प्रचिती नुकतीच बीडमध्ये गंडले कुटुंबाच्या बाबतीत आली आहे. बीड येथील सुप्रसिद्ध ज्येष्ठ वकील अविनाश गंडले आणि त्यांच्या पत्नी मनीषा अविनाश गंडले ज्या औरंगाबाद येथे सरकारी वकील आहेत. त्यांची कन्या सोनिया हिने अत्यंत अवघड मानल्या जात असलेल्या परीक्षेत यश मिळविले असून तिची न्यायाधीश पदी निवड झाली आहे. हे खूप मोठे यश असून वकील दांपत्ये असलेल्या कन्येने असे यश मिळविणे निश्चितच गौरवास्पद आहे.

आई आणि वडील दोघेही वकील असल्याने त्यांच्या दोन्ही मुलांना लहानपणापासूनच कायद्याची आवड आणि त्याचे महत्त्व पटत गेले. गंडले दांपत्याने मुलगी सोनिया आणि मुलगा अनिकेत या दोघांनाही कायद्याचे शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यात सोनिया ही यशस्वी ठरली असून अनिकेत सध्या कायद्याचा विद्यार्थी आहे. सोनिया हिचे दहावीपर्यंतचे शिक्षण बीड येथील चंपावती विद्यालयामध्ये झाले. त्यानंतर अकरावी बारावीचे शिक्षण तिने औरंगाबाद येथे घेतले आणि बारावी पास झाल्यानंतर सुप्रसिद्ध अशा एमपी लॉ कॉलेजमध्ये तिने कायद्याच्या पदवीसाठी प्रवेश मिळविला. त्याच ठिकाणी एलएलबी पूर्ण केली आणि पुढे एलएलएम सुद्धा याच ठिकाणी पूर्ण केले. दरम्यानच्या काळामध्ये एलएलएम करत असतानाच औरंगाबाद येथेच सोनियाची वकिलीची प्रॅक्टिसही सुरू होती. दुसरीकडे न्यायाधीश पदासाठी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू होती. २०२२ मध्ये याची पूर्व परीक्षा झाली. त्यामध्ये यश मिळाल्यानंतर त्याची मुख्य परीक्षा पार पडली आणि त्यानंतर मुलाखत झाली. परीक्षेच्या या तीनही टप्प्यावर सोनीयाने उत्कृष्ट यश मिळविले. नुकत्याच लागलेल्या निकालामध्ये तिने महाराष्ट्रातून सहावा क्रमांक मिळविला आणि न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग पद हस्तगत केले. यासाठी सोनियाने प्रचंड मेहनत घेतली. वकील असलेले वडील अविनाश गंडले आणि सरकारी वकील असलेल्या आई मनीषा यांचे योग्य मार्गदर्शन तिला लाभले. गंडले कुटुंबाचा वारसा पुढे चालविताना सोनिया हिनी मिळविलेले हे यश अत्यंत गौरवास्पद असून, त्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



बीड :- पवित्र रमजान ईद निमित्त शहरातील हत्ती खाना येथील हजरत शहा शमशोद्दीन दर्गा कबरीस्तानची साफ - सफाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड नगर परिषद कार्यालयात करण्यात आली होती.मनसेच्या या मागणीची दखल घेत बीड नगर परिषदेच्या वतीने आज हजरत शहा शमशोद्दीन दर्गा कबरीस्तानची साफ - सफाई करण्यात आली.यावेळी उपस्थित मुकदम पप्पू साळवे,शुभम गायकवाड, सचिन ससाने, सचिन मोरे, पप्पू डोळस, सिद्धार्थ वाघमारे, मधुकर सुरवसे,भालेराव सह इतर सफाई कामगार मोठे संख्येने साफ - सफाई करत असताना छायाचित्र दिसत आहे.

## पारंपरिक शेती ऐवजी फुलशेती करत मुळुकवाडी येथील

# शेतकरी चंद्रसेन ढास यांनी फुलवला समृद्धीचा मळा :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश : बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतकरी चंद्रसेन शेषेराव ढास या शेतकरी कुटुंबाने पारंपरिक पिकांऐवजी फुलाची शेती करत समृद्धीचा मळा फुलवला आहे. साधारणतः १००० लोकसंख्या असलेल्या मुळुकवाडी गावातील शेतकरी प्रामुख्याने कांदा पिक घेतात.संपुर्ण लिंबागणेश पंचक्रोशीत एकमेव फुलशेती करणारे शेतकरी म्हणून चंद्रसेन ढास यांची ओळख आहे.१२ वर्षांपूर्वी मुळुकवाडी येथील १० शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गुलाब फुलांची गटशेती करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर केवळ चंद्रसेन ढास यांनीच फुलशेती व्यावसाय तग धरून जिद्दीने करत आहेत. सकाळी उठून कळी तोडली तरच २ दिवस ती टिकते त्यामुळे यासाठी घरचे मजुर असणे गरजेचे आहे. चंद्रसेन ढास यांना ५ एक्कर शेती असुन त्यापैकी ३ एक्कर शेतात फुलशेती करतात. फुलांना योग्य दर मिळण्यासाठी लागवड



ऐन उन्हाळ्यात म्हणजे पाणी टंचाईच्या काळात करावी लागते.पावसाळा सुरू असताना उत्पादन निघण्यास सुरूवात होत असल्याने अनेकदा कमी जास्त पावसाचा फटका फुलशेतीस बसतो मात्र अस्मानी सुलतानीचा विचार न करता जोखीम पत्करून फुलशेती करतात. फुलांना श्रावणात, गणेशोत्सवात तसेच नवरात्रोत्सवात मोठ्या प्रमाणावर मागणी असते.फुलांचे बाजारभाव स्थिर नसतात. गुलाब, गलांडा, गुलछडी,बिजली,अश्टर,झेंडु, शेवंती आद फुलांचे उत्पादन करण्यात येते. बीड,केज, पाटोदा याठिकाणी फुले विक्रीसाठी पाठवली जातात.चंद्रसेन ढास यांच्या पत्नी सविता ढास,मुलगा प्रणव ढास,अथर्व ढास फुलशेतीत मदत करतात. मोठा मुलगा प्रणव ढास यांने पुणे येथे इव्हेंट मॅनेजमेंट कोर्स केलेला आहे तर अर्थव शिक्षण घेत आहे. लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकरी फुल सेंटर प्रसिद्ध असुन धार्मिक,लग्न समारंभ, वाढदिवस विविध कार्यक्रमांसाठी आवश्यक हारांसाठी चंद्रसेन ढास यांच्याकडे मागणी असते.

शेतकऱ्यांना फुलशेती मध्ये चांगले उत्पन्न मिळू लागले आहे.शेतक-यांनी योजनेचा लाभ घेऊन फुलशेती मध्ये प्रगती करावी यासाठी शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग,वनपिके, मसाला पिके व फुलशेती आदींसाठी १ वर्ष ते ३ वर्ष अनुदान तत्वावर शासकीय योजना कार्यान्वित आहे.मात्र बीड कृषी विभागाची अनास्था यास कारणीभूत असुन दोन वेळा केलेली फाईल त्यांनी आपल्या भागात फुलशेती नसल्याने नाकारली असल्याची खंत चंद्रसेन ढास यांनी बोलून दाखवली.

## महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्यासह ५ मंत्र्यांच्या उपस्थितीत

# लोकशाहीचा लोकरत्न पुरस्कार सोहळा शाही थाटात होणार साजरा!

लोकशाही पत्रकार संघाच्या लोकरत्नसह विविध क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कारास प्रस्ताव पाठवावे- प्र. अ. प्रताप साळुंके

संभाजीनगर ।प्रतिनिधी
लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने यावर्षी लोकरत्न, पुरस्कारासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या दिग्जांना राज्यस्तरीय समाजरत्न,कृषीरत्न,शिक्षणरत्न,उद्योगरत्न,, सहकाररत्न, साहित्यरत्न, कलारत्न, क्रीडारत्न, आरोग्यरत्न, आदर्श पत्रकार,आदर्श पोलीस, आदर्श व्यक्ती,आदर्श ग्रामपंचायत, आदर्श शिक्षक,आदर्श प्राध्यापक, आदर्श शासकीय अधिकारी,आदर्श कॉन्ट्रॅक्टर, आदर्श वकील, आदर्श शाळा यांना राजस्थानचे राज्यपाल महामहिम हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते लोकरत्नसह विविध रत्न पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत, हा सोहळा संभाजीनगर येथील एकनाथ रंगमंदिर येथे करण्याचे आयोजित केले आहे. १९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३ वाजता हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी माननीय महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे , राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाठ, कॅबीनेटमंत्री अतुलजी सावे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे,मा. पालकमंत्री तथा मंत्री खासदार सांदिपानजी भुमरे पाटील, माजी खा. इम्तियाज जलील, आ. प्रदीप जैस्वाल, आ. संदीप क्षीरसागर, आ. प्रशांत बंब,राष्ट्र संत



रामगिरीजी महाराज, मराठवाड्यातील आय ए. एस./ आय पी एस अधिकारी यांचीही उपस्थिती राहणार आहे.

लोकशाही पत्रकार संघाने संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदिप जाधव, प्रदेशाध्यक्ष प्रतापराव साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक वर्षापासून कृषीरत्न, शिक्षणरत्न, उद्योगरत्न, समाजरत्न, सहकार, साहित्य, कला, क्रीडा, आरोग्य, पत्रकार,पोलीस,आदर्श व्यक्ती, आदर्श ग्रामपंचायत, आदर्श शिक्षक, आदर्श प्राध्यापक, आदर्श शासकीय अधिकारी,आदर्श कॉन्ट्रॅक्टर, यांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ज्या आदर्श व्यक्तिमत्वांना यंदाचा लोकशाही पत्रकार संघाचा राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ चा घ्यायचा असेल त्यांनी खालील मान्यवर कमिटीशी संपर्क साधावा.भागवत वैद्य बीड ८४५९६९७३२८/ संदीप जाधव मुंबई ८७८८७३४४४०/ प्रताप साळुंके संभाजीनगर ७५८८१९७४०५ /गणेश जगदाळे नाशिक ९०७५० १७५०८/आयेशा मुलानी जालना ९८२२०२१८७५ / निलोफर शेख सिल्लोड ९१४६६ ५६५६३/ श्रद्धा कंडूडे पुणे ९२०९६५१००४/ जयश्री बस्ते नाशिक ९१६८७ ००१०९/ अयुब पठाण संभाजीनगर ८३२९५४६८५०/ पाटील शुभा पुणे ९८९०७ ९४६७० /महेबूब शेख परभणी ७२१८२५४२५२/ वसीम आजाद ९७३०४ २४३४३ /प्रभाकर पांडे नांदेड ९९७५०३४२०७/बाजीराव गायकवाड धाराशिव ७०६६९ ५३८०८ /अनिस कुरेशी संभाजीनगर ९५४५४९३५४४ /अरिफ सय्यद नांदेड ९८६०८ २१५५२/ अंबादास सर सोलापूर ८८८८७७२५५३/नितीन जाधव लातूर ९८८१८ २८२३०/अस्लम खान जळगाव ९१४५१ ६१५८३/गणेश चेडे अंबड +९१ ९५५२३ ०७६५२/संध्या सरोदे परळी ७७२१० ५३५०८/सुनील भोसले ९१४६२ ४१९५६/साजेद सय्यद बीड ९०२८९ ६७०६०/फैमीदा शेख रत्नागिरी ७६६६० १६८५२/राणीताई झिंजूर्डे पाटील ८०१०६ ५३०२९ज्यांना लोकरत्न, सह विविध पुरस्कारासाठी आपले नामनिर्देशित करायचे असेल त्यांनी कमिटीशी संपर्क साधावा असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाटोदा नगरपंचायत नगरसेवक अपात्रता प्रकरण दुसऱ्या जिल्हाधिकारीकडे वर्ग; उच्च न्यायालयाची नोटीस

बीड ।प्रतिनिधी
पाटोदा नगरपंचायत नगरसेवक अपात्रतेचे प्रकरणे जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून काढून घेऊन दुसऱ्या जिल्हाधिकारीकडे वर्ग करण्यासाठी माननीय उच्च न्यायालयाची नोटीस पाटोदा नगरपंचायत चे नगरसेवक सय्यद अब्दुल्ला सय्यद यासीन तसेच बळीराम बाबासाहेब पोटे यांनी त्यांच्या पाटोदा नगरपंचायतच्या नगरसेवक कालावधीमध्ये त्यांच्या स्वतःच्या मुलांना नगरपंचायत पाटोदा यांच्या वतीने करण्यात येणारे विविध लोक उपयोगी कामांमध्ये कॉन्ट्रॅक्ट दिल्यामुळे व पाटोदा नगरपंचायत च्या ऑडिटमध्ये तत्कालीन नगरसेवक व ठेकेदार यांच्यावर रकमा व सुलीचे निर्देश असल्यामुळे पाटोदा येथील शेख मोबीन शेख हमीद, अब्लूक हिराजी घुगे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष शिवभूषण लक्ष्मणराव जाधव यांनी जून २०२३ मध्ये जिल्हा अधिकारी, बीड यांच्या कार्यालयात, महाराष्ट्र नगरपालिका नगरपंचायत कायदा १९६५ कलम १६(ळ)(हर), ४(३), प्रमाणे अपात्रतेचे जल्हाधिकारी बीड यांच्याकडे प्रकरणे दाखल करून सय्यद अब्दुल्ला सय्यद यासीन व बळीराम बाबासाहेब पोटे, यांना पाटोदा नगरपंचायत चे नगरसेवक म्हणून अपात्र करण्याची विनंती केली होती.सदरील प्रकरणांमध्ये दिनांक १२/०३/२०२४ रोजी जिल्हाधिकारी यांच्यापुढे सुनावणी होऊन सदरील प्रकरणने निकालासाठी राखीव करण्यात आले होते. परंतु सदरील प्रकरणात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी ऑगस्ट २०२४ पर्यंत कुठलाही निकाल दिलेला नाही. त्यानंतर २१/०८/२०२४ रोजी शेख मोबीन, अबलूक घुगे, व शिवभूषण जाधव यांनी सचिव शहर विकास विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त छ. संभाजीनगर यांना लेखी अर्ज देऊन वरील अपात्रतेच्या प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडून न्याय मिळवण्याची शंका व्यक्त करून जिल्हाधिकारी पाठक साहेब यांनी बीड जिल्ह्यामध्ये अनेक वर्षापासून काम केल्यामुळे सय्यद अब्दुल्ला जो की राजकीय दृष्ट्या प्रभावी असून तो माजी बीड जिल्हा परिषद अध्यक्ष आहे. तसेच बळीराम पोटे प्रभावी राजकारणी आहे. दोघेही भारतीय जनता पार्टी माजी मंत्री आ.सुरेश धस यांच्या जवळचे असून दोघांचेही जिल्हा अधिकारी पाठक साहेब यांच्याबरोबर संबंध आहेत.अशी चर्चा अब्दुल्ला व बळी पोटे यांचे कार्यकर्ते करत असून काहीही करून कुठल्याही मार्गाने पाठक साहेब यांच्याकडून वरील दोन्ही अपील ते खारीज करून घेणार अशा बावड्या पाटोदा शहरांमध्ये आहे. असे त्या अर्जामध्ये नमूद करून व पाठक साहेब यांच्याकडून न्याय मिळवण्याची शंका निर्माण झाल्यामुळे दोन्ही अपील दुसऱ्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करून त्या सुनावणीचा टाईम बॉण्ड करून प्रकरणाचा निकाल देण्यात यावा, अशी विनंती केली होती. परंतु सचिव शहर विकास विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई व विभागीय आयुक्त छ.संभाजीनगर यांनी सदरील अर्जावर कुठलीही कारवाई न केल्यामुळे शेख मोबीन शेख हमीद व शिवभूषण लक्ष्मणराव जाधव यांनी मार्च २०२५ मध्ये माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये याचीका क्रमांक. ३९०१ व ३९०८/२०२५ दाखल करून जिल्हाधिकारी बीड यांनी सदरील प्रकरणांमध्ये एक वर्षाचा कालावधी लोटूनही निकाल न दिल्याने कायद्यामध्ये अपात्रतेच्या तरतुदीचा मूळ आदेश



भंग होत असून जिल्हाधिकारी पाठक यांच्याकडील वरील दोन्ही प्रकरणे औरंगाबाद महसूल विभागातील दुसऱ्या कोणत्याही जिल्हाधिकारी यांच्याकडे वरील प्रकरणे वर्ग करावे अशी विनंती केली आहे.सदरील याचिकांची सुनावणी दि. २५/०३/२०२५ रोजी माननीय न्यायमूर्ती मंगेश पाटील व मा. न्यायमूर्ती खोब्रागडे यांच्या खंडपीठा पुढे झाली असता मा.उच्च न्यायालयाने सदरील प्रकरणात सचिव शहर विकास महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त औरंगाबाद, जिल्हाधिकारी बीड तसेच सय्यद अब्दुल्ला सय्यद यासीन व बळी बाबासाहेब पोटे याना नोटीस काढल्या असून जिल्हाधिकारी बीड यांनी सदरील अपात्रतेच्या प्रकरणांमध्ये अंतिम आदेश पारित करू नये, असे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक १५/०४/२०२५ रोजी ठेवलेली आहे. याचिकाकर्त्याच्या वतीने ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी काम पाहिले व त्यांना ड. सोनाली सोमवंशी, ड. रवींद्र वानखेडे, ड. गौरव खांडे यांनी सहकार्य केले.

# उच्च स्वप्नपूर्ती करिता जिद्द व चिकाटीच्या प्रयत्नाच्या सातत्याची आवश्यकता प्रा. डॉ.नामदेव शिनगारे

## महामानव अभिवादन ग्रुप तर्फे शालेय साहित्य वाटप

बीड ।प्रतिनिधी

शिक्षण म्हणजे सत्य जाणणे, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून, दैववाद, किंवा अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरेतून, बाहेर पडल्याशिवाय उच्च स्वप्नपूर्ती करिता. जिद्द, चिकाटी व प्रयत्नाच्या सातत्याची आवश्यकता आहे. अशी प्रत्येक विद्यार्थ्याने मनाशी खुणगाट बांधावी असे प्रतिपादन प्रा. डॉ.नामदेव शिनगारे यांनी केले.

महामानव अभिवादन ग्रुपला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन म्हणजेच २०२४ रोजी मिळालेले साहित्य वाटपाचा नव्या फेरीतील धानोरा रोड बीड नागसेन बुद्ध विहारात आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदी लाभलेल्या नागसेन बुद्ध विहार मंडळाच्या सचिव केशर कांबळे व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ.नामदेव शिनगारे , अँड तेजस वडमारे व एस.एस. सोनवणे यांच्या हस्ते ४३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) वाटप करण्यात आले. याप्रसंगी ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले , वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी. वानखेडे, कॅप्टन राजाभाऊ आठवले याची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक गायकवाड यांनी तर सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक यु.एस. वाघमारे यांनी प्रस्तावित केले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते आदर्शाच्या प्रतिमेचे पुष्प व पुष्प माला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पालकांशी व विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना प्रा. शिनगारे पुढे म्हणाले की दीन, दलित, गरजू व वंचितांची सेवा हीच सेवा मानव कल्याणाची आहे. हा संत गाडगेबाबांचा बहुमोल उपदेश असू, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून त्या वैज्ञानिक प्रगतीला तथागताने सांगितलेल्या पंचशीलाची जोड दिल्यासच जगात शांतता व बंधुत्वाची वृद्धी होईल व जग विनाशापासून वाचेल असे अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. याप्रसंगी न्यू स्टार रायझिंग इंग्लिश स्कूलचे कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी अत्यंत सोप्या भाषेत बालकांना समजावून सांगितले की विद्यार्थीदशेत गुरुजनांची , पालकाची आज्ञा पाळणे व ज्ञान मिळवणे, तरुणपणी शील पालन करून दोन कमावले व म्हातारपणी सुख समाधानाने जगून होईल तेवढे समाज रोड फेडणे याबद्दल अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. दुसरे प्रमुख पाहुणे अँड. तेजस वाडमारे, यांनी स्पष्ट केले की विहारेही संस्कार केंद्रे व्हावीत व त्यामध्ये बालकांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरता आपल्या पाल्यास दर रविवारी नियमितपणे विहारात आणून समाज



प्रबोधनात्मक, तथागतांच्या , डॉ. बाबासाहेब आंबेडकर व फुले, शाहू, आंबेडकर विचारसरणीच्या सर्वच महापुरुषांच्या आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवावा याविषयी माता भगिनींना आग्रहाची विनंती केली. तर प्रशांत वासनिक यांनी ह्या इंटरनेटच्या जमान्यात त्याचा आपल्या प्रगती करिता सदुपयोग करावा याबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना मुलांचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी.एम.राऊत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करता नागसेन बुद्ध विहार महिला मंडळाच्या सर्व सदस्या व नंदिनी साबळे यांनी बहुमोल परिश्रम घेतले . कार्यक्रमास परिसरातील सोनी थोरात, विद्या कोरडे, छाया धनवे, अश्विनी साबळे, सागरबाई वीर, मनोहर कांबळे, के.एस.वाघमारे, इंजि उमाजी आठवले, संजय शिरसाठ, सुंदर तांगडे, निवृत्ती शिंदे, बहुसंख्य पालक व विद्यार्थी उपस्थिती होती सरणातयेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अर्धमसाला ची घटना वर गैर जीमेदार वक्तवे केल्या बद्दल

## आ. सुरेश धसचा जाहीर निषेध:अयाज कागजी

बीड ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील अर्धमसाला गावात रामाजन ईद च्या आदल्या दिवशी ३० तारीख ला मस्जिद मध्ये जिलेटिंग चा सफोट करण्यात आला.हे सफोट श्रीराम सांगळे आणि विजय गव्हाणे घडून आणली. या दोघांना अटक करण्यात आली आहे.या प्रकरणात आ. सुरेश धस यांनी आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे ही घटना संदल वगैरे च्या वयक्तिक करणं वर झाली आहे असे धस म्हणाले आहे. जर ही घटना व्यक्ती करणातून झाली आहे तर जिलेटिंग चा वपार मस्जिद मध्या का केला?? पवित्र मस्जिद हे अल्लाह चा घर आहे, कुणा एकाची नाही. ते आरोपी दारुळे आहे म्हणून ही घटना सोडून दया असे म्हटले आहे. धार्मिक स्थळ कोणते ही असो जर कोणी दारूचे नशेत हे केले तर समाज त्यांना माफ करणार का?? मग ही घटना सोडून का द्याची???



उद्या दारूच्या नशेत कोणी काय भी करू शकतो!!! सुरेश धस एक लोकप्रतिनिधी आहे त्यांनी असे बेजबाबदार वक्तवे नको करायला पाहिजे, त्यांचा वक्तव्य मुळे संपूर्ण मुस्लिम समाजाचे मन दुखावले आहे, त्यांचं या वक्तवे चा जाहीर निषेध करतो व त्यांनी लवकरच लवकर माफी मागावी असे पत्रक अयाज कागजी यांनी दिले आहे



# लिंबागणेश येथे अर्धमसला मस्जिद स्फोट आणि पाचेगाव येथील कानिफनाथ मंदिरावर हिरवे झेंडे फडकवत

लिंबागणेश: बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावातील मशिदीमध्ये रमजान ईदच्या पुर्वसंध्येला आणि गुढीपाडव्याच्या दिवशी समाजकंटकांनी मस्जिदच्या आतील भागात जिलेटीनच्या कांड्यांनी स्फोट घडवून आणला. स्फोट घडवून आणलेल्या ठिकाणी मोठा खड्डा पडला असून भिंतीला तडे गेले आहेत, खिडक्या, दरवाजे,पंखे तुटून पडले आहेत.या घटनेने जिल्हा हादरला असुन संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे .या घटनेचा सर्व स्तरातून निषेध होऊ लागला असुन स्फोट

घडवुन दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने पुर्व नियोजित कट करून मुस्लिम समाजाच्या प्रार्थना स्थळाचे नुकसान करत धार्मिक भावना दुखावणा-या समाजकंटकांना कठोरात कठोर शासन करण्यात यावे या मागणीसाठी आज दि.१ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील सर्व समाजबांधवांनी एकत्र येऊन गावाच्या मुख्य प्रवेशद्वारावर स्फोट घडवणा-या समाजकंटकांवर कठोर कारवाई करा, हम सब एक है, हिंदू -मुस्लिम भाई भाई अशी घोषणाबाजी करत काळे झेंडे दाखवत तिव्र निदर्शने करण्यात आली. याचवेळी गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथील कानिफनाथ मंदिरावर काही लोकांनी हिरवे झेंडे लावून तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागण्याचे निवेदन पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना देण्यात आले. यावेळी डॉ.गणेश ढवळे , भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ,सरपंच बालासाहेब जाधव,राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात,शेख समीर, लेनाजी गायकवाड,शेख ख्वाजा, संतोष भोसले, गणपत तागड,विक्रांत वाणी, अँड.गणेश वाणी ,बाळासाहेब मुळे, सुदाम मुळे,सय्यद अख्तर, सय्यद फिरोज, सय्यद सलीम, सय्यद नुर,सय्यद अझीम , सय्यद शाकीर,शौकत तांबोळी,शेख सत्तार,आरूण ढवळे, सय्यद रफिक, सय्यद फिरोज, उस्मान तांबोळी , शेख वसीम,शेख बबलु,शेख नाझीम, सय्यद अझीम, सय्यद हबीब, सय्यद ताहेर आदी सहभागी होते.

# खर्च वाचविण्यासाठी चळवळ पुढी आली पाहिजे तसें झाले तर शेतकरी आत्महत्या थांबातील

शिराढोण -आजकाल लग्नाचे समारंभ फार खर्चिक झाले. खर्च वाचविण्यासाठी चळवळ पुढी आली पाहिजे तसें झाले तर शेतकरी आत्महत्या थांबातील मुलीच्या आई वडिलांवार संकट येणार नाही आता मुलीच्या आत्महत्या सुरूच आहेत हुंदाबळी तर मोठ्या प्रमाणात होतात म्हणून पैशाकडे नं पाहता गुणाकडे पाहावे. लग्नात फटाके फोडण, उधळपट्टी टाळली पाहिजे. लग्नाची वेळ राहते आठ वाजून बत्तीस मिनिट अन नाच नाच वाजवते बारा. लागुद्या लग्न आता असे विचार समाज प्रमोधनकार सत्यपाल महाराज सप्त खंजेरी वादक यांनी मांडले. कळंब तालुक्यातील शिराढोण येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती, महात्मा फुले जयंती, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती व सर्वज्ञ प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती निमित्त समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचा कार्यक्रम शुक्रवारी पार पडला. या वेळी अध्यक्ष सरपंच लक्ष्मी ताई म्हेत्रे,प्रमुख पाहुणे डॉ. शैलेंद्र चव्हाण अदिष्ठाता धाराशिव मेडिकल



कॉलेज, रेणुका डुंबरे विश्व संकल्प फाउंडेशन ओतूर पुणे,वैशालीताई लोंढे यादव,शिवलीला कानडे,स्वेताताई लोंढे नगर सेवक लातूर, मा जि प सदस्य शहाजी पाटील हे होते.प्रभोधन करताना समाजात तेढ निर्माण होईल असे कोणी वागले नाही पाहिजे सर्व धर्म समभाव ची भावना प्रत्येक व्यक्ती मध्ये राहिली पाहिजे. शेतकरी व शेतमजूर यांनी समुदाईक विवाह जुळवावे गावातील सर्व विवाह एकाच दिवशी एकाच मंडपात करावे, विवाह नोंदणी पद्धतीने करावा, घातक रूढी आणि अवस्थावं खर्च टाळावा, तिथी पंचांग पाहण्या पेक्षा पोरापोरीचे सद्गुण पाहावे.वृक्ष लावा मोक्ष मिळावा आदी विषयावर ब्रभोदान केले. आणि सप्त खंजेरीचे वाद कांचे वादन करून दाखवले.प्रभोधन करताना श्रोत्या तुन काही लोकांना प्रश्न विचारून समाज प्रबोधन करीत त्यांचा सत्कार करण्यात आला व काही महिलांना साड्याची भेट ही देण्यात यावेळी रेणुका ताई डुंबरे यांनी वृक्ष संवर्धन व गोशाळेविषयी मुक्या प्राण्यांना जीवनदान देण्यासाठी समाजाने प्रयत्न करण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले आली.या वेळी किरण पाटील, निलेश नाईकवाडे, सतीश शिंपले, चंद्रकांत महाजन, नासेर पठाण, वरून पाटील अमोल नाईकवाडे, विक्रम नाईकवाडे, अनिल गायसमुद्रे,ताजखा पठाण,ग्रामपंचायत सदस्य ज्योती महाजन, बेबी नंदा गोरे,अंजली गायकवाड, ज्योती नाईकवाडे, कोमल नाईकवाडे आदी उपस्थित होते.सूत्रसंचालन चंद्रकांत महाजन व निलेश नाईकवाडे यांनी केले.यांचा झाला सन्मान : १) नवोदय साठी सहा पात्र विध्यार्थी :प्राची कैलास खडबडे,सानवी महादेव समुद्रे,श्रावणी दयानंद राऊत ,पंकजा पंढरी जाधवर,अभिषेक चंद्रशेखर कुलकर्णी,तेजस्विनी किरण राऊत.शिक्षक रमेश व्होके,रमेशकुमार काकडे २) या गावाकऱ्यांचा झाला सन्मान :बिभीषण पवार, विठ्ठल खडबडे,रवी नाईकवाडे,पांडुरंग कोळी,मंजूर दखनी, प्रतीक संगवे,खंडू वाघमारे,अभिजित पाटील,असिफ खैरात शेख,चक्रधर यादव,ज्योती महाजन,उषा दुगाने,




# इंसानियत का पैगाम हर धर्म सिखाता है,नफरत नहीं,मोहब्बतही रब तक पहुंचाता है।

## बाबुराव पोटभरे यांच्या इफ्तार पार्टीत माजलगावकरांनी ताकतीने दिला एकतेचा संदेश....

माजलगाव ।प्रतिनिधी

पवित्र रमजान निमित्त शुक्रवार दि.२८ रोजी बाबुराव पोटभरे यांच्या पुढाकाराने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.या इफ्तार पार्टीला मोठ्या संख्येने सर्वधर्मिय नागरिकांनी उपस्थित राहत समतेचा,एकतेचा संदेश दिला.बंधुभाव आणि सलोखा हाच आमच्या शहराचा गौरव,हीच आमची ओळख.कोणतीही वाईट ताकत ही ओळख तोडू शकत नाही.कारण'इंसानियत का पैगाम हर धर्म सिखाता है,नफरत नहीं, मोहब्बतही रब तक पहुंचाता है।' हेच अंतिम सत्य यावेळी माजलगावकरांमध्ये असणाऱ्या भाईचाऱ्यातून येथे दिसत होतं. राजस्थानी मंगल कार्यालय येथे संध्याकाळी ५ ते ७ वाजन्याच्या दरम्यान ही इफ्तार पार पडली. समाजात सामाजिक सलोखा व एकात्मतेच्या उद्देशाने बहुजनांचे नेते बाबुराव पोटभरे यांच्या पुढाकारात आयोजित इफ्तार पार्टीत शेख बाबा पोटभरे साहेब बाळु ताकट यांची शिव जन्मोत्सव समिती,सुरेंद्र रेदासनी यांचा व्यापारी महासंघ व रियाज काझी यांच्या महापुरुष जन्मोत्सव समितीचा सहभाग होता.दरम्यान

नियोजित वेळात उत्साहात इफ्तार पार्टीची सुरुवात झाली.यात माजी आ.मोहनराव सोळंके,माजी आ. राधाकृष्ण होके पाटील,माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस,जेष्ठ नेते दयानंद स्वामी, मा बाधकाम सभापती राजेश साळवे डॉ. जेथलीया,उपसभापती श्रीहरी मोरे, पो.नि.राहुल सूर्यतळ,नासिर खान, माजी नगराध्यक्ष शे.मंजुर,तालेब चाऊस,वीरेंद्र सोळंके,डॉ.मनसबदार,शेख रहीम, खलिल पेंटर,शेख इंद्रिस पाशा, अभय होके,मुज्जमील पटेल, नवनाथ धायजे,भीमराव टाकणखार,शरद यादव,प्रदीप पटेकर,शेख फारुख,सदानंद प्रधान अशोक लांडगे,सचिन जावळे, फारुकअण्णा,राहुल मस्के,दीपक टाकणखार,इत्यादींसह अनेक पक्षाचे राजकीय नेते,कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी, डॉक्टर,पत्रकार,वकील,ज्येष्ठ नागरिकांसह तरुणांची मोठी उपस्थिती होती.उत्साहवर्धक सुरू असलेल्या या इफ्तार पार्टीत समस्त माजलगावकरांनी सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.दरम्यान बाबुराव पोटभरे यांच्या समाजाभिमुख नेतृत्वाचे यानिमित्ताने कौतुक होत आहे.ज्या ज्या वेळी विघ्नसंतोषी घटकाकडून समाज विघटनाचं षडयंत्र रचल्या जातं,त्या त्यावेळी पोटभरे यांची समाज एकसंघ ठेवण्याची भूमिका नेहमीच कौतुकास्पद राहिली आहे. त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले की राजकारणापेक्षा समाजकारण ही आपली नैतिक जबाबदारी आहे. आणि हाच त्यांचा ब्रँड आहे. राजकारण हे सत्ता मिळवण्याचे साधन असले तरी समाजकारण हीच आपली ओळख आहे.त्यांच्या या ओळखीमुळेच इफ्तार पार्टीच्या निमित्ताने समस्त माजलगावकरांनी एकतेचा दीप उजळवला,जो अनेकांसाठी प्रेरणादायी ठरेल.'इंसानियत का पैगाम हर धर्म सिखाता है,नफरत नहीं,मोहब्बतही रब तक पहुंचाता है।'हेच ब्रिद या निमित्त या इफ्तार पार्टी निमित्त जाणवत होतं.

# करणार काय ? सांगणार कुणाला ?

**दिनांक ०२ मार्च २०२५ पासून इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र महिना रमज़ान सुरू झाला होता. आणि दिनांक ३० मार्च २०२५ रोजी मग़रीब नमाज़ नंतर थोड्यावेळाने चंद्र दिसल्याचे जाहीर झाल्यानंतर दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी रमज़ान ईद मुस्लिम बांधव स्वधर्मीयांसह इतर सर्व जाती धर्मातील बंधू-भगिनींसोबत मिळून साजरी केली.**

**परंतु तत्पूर्वी रमज़ान ईद ची ओळख असलेले शीरखुर्मा हे खाद्य पेय बनविण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेले दूध लागते ते घेण्यासाठी मुस्लिम बंधू-भगिनी जेव्हा बाजारात आले तेव्हा ठीकठिकाणी आपापले मोठमोठे टँकर्स घेऊन दूध विक्रेते दूध विकत होते.**



काही वर्षांपूर्वी शासन चालवीत असलेल्या शासकीय दूध डेअऱ्यांमधून दुधाचे टँकर यायचे. त्या दुधाचे दरही सर्वसामान्य गोरगरिबांना परवडेल आणि दैनंदिन जीवन जगत असताना मिळणाऱ्या दुधाच्या दरापेक्षा त्या दुधाचे दर हमखास कमी असायचे. परंतु शासन-प्रशासनाच्या अनास्थेमुळे तसेच योग्य नियोजनाच्या अभावामुळे शासकीय दूध डेअऱ्यांना टाळे लागले आणि मग तिथून सुरू झाल्या खाजगी व्यापाऱ्यांच्या दूध डेअऱ्या.एरवी उच्चभ्रू, काही प्रमाणात मध्यमवर्गीय आणि चहाचा व्यवसाय करणारे हॉटेल चालक वगळता सर्वसामान्य गोरगरीब या खाजगी दूध डेअऱ्यांच्या दुधाकडे ढुंकणही पाहत नाही परंतु रमज़ान ईद साजरी करण्यासाठी शीरखुर्मा बनविण्याकरिता दुधाची मागणी वाढते आणि मागणीप्रमाणे दूध उत्पादक असलेल्या शेतकऱ्यांकडून चांगल्या प्रतीचे दूध हवे त्या प्रमाणात मिळत नसल्याने नाविलाजास्तव लोकांना या खाजगी दूध डेअऱ्यांच्या टँकर वाल्यांकडून दूध घ्यावे लागते.कालही या खाजगी दूध डेअऱ्यांच्या टँकर वाल्यांकडून ठीकठिकाणी लाईनीत उभे राहून लोकांना दूध घ्यावे लागले.खाजगी डेअऱ्यांवाले याला दूध म्हणत असल्याने घेणाऱ्यांनीही दूध म्हणून ते ६० साठ रुपये प्रति लिटर प्रमाणे विकत घेतले.

आता प्रश्न पडतो की, जेव्हा हे खाजगी दूध डेअऱ्यांवाले लोकांना ६० रुपये प्रति लिटर प्रमाणे जे दूध विकत होते ते खरेच हे शेतकऱ्यांकडून एवढ्या मोठ्या दराने विकत घेतात का? तर याचे उत्तर नाही असेच आहे.शिवाय एवढ्या महाग दराने घेतलेले दूध कसे आहे तर त्याच्यात ना दुधाचा गंध, ना घट्टपणा, ना त्याच्यावर साय येण्याचा पत्ता, माप घेताना फक्त पाण्याचे बुडबुडे आलेले पाहून हे दूध कमी आणि पांढरे पाणी जास्त असा सगळा प्रकार होता.या दुधापासून बनविण्यात येणारा शीरखुर्मा एवढा सपक बनतो की, त्याच्यात दुधाची चवच नसते. शीरखुर्मा तयार करताना या दुधात महाग मोलाचा सुकामेवा ज्यात काजू, बदाम, पिस्ता, अक्रोड, चारोळी, खारीक, मनूके, खवा, गावरान तूप, खोबरे, साखर अशा अनेक वस्तू टाकून बनविला जातो.दुधाच्या मानाने या सर्व वस्तूंची किंमत ही अनेक पटींनी जास्त असते. असे असूनही अनेक पट खर्च करून जो शीरखुर्मा बनविला जातो, त्यात मुळात सपक दूध म्हणजेच पांढरे पाणी असते. यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करून ही शीरखुर्मा बनविणाऱ्यांसह तो ग्रहण करणाऱ्यांनाही मानसिक आणि चवदार समाधान मिळत नाही. मात्र शीरखुर्मा बनविण्याची वर्षानुवर्षांपासून चालत आलेली रीत आणि ईद साजरा करण्याचा आनंद यामुळे मुस्लिम बांधवांना हे निकृष्ट आणि सपक दूध खरेदी करावेच लागते.

जर हे दूध घेतले नाही तर दूध दुभत्याचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांकडून सुद्धा दर्जेदार दूध मिळत नाही. यामुळे मुस्लिम बंधू-भगिनींनी खाजगी दुध डेअऱ्यांकडून आलेल्या टँकर वाल्यांकडून खरेदी केलेल्या सपक आणि बेचव दुधाला पाहून अनायासे मजबूरी का नाम महात्मा गांधी असेच म्हणावे लागते. परंतु हे सगळं सांगणार कुणाला? आणि करणार काय? असे प्रश्न निश्चितपणे या अनुषंगाने उपस्थित होतात. अन् ही अवस्था दिवसेंदिवस शासन प्रत्येक क्षेत्राचे करत असलेल्या खाजगीकरणामुळे होत आहे. याला शासकीय दूध डेअऱ्या बंद करून खाजगी दूध डेअऱ्या सुरू करण्याचे धोरणही अपवाद नाही.

लेखन - एस.एम.युसुफ़ (मुक्त पत्रकार)
आसेफ़नगर, बीड
संपर्क - ९०२१ ०२ ३१२१

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com